राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३१७१ / २०२४ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| देशमुख मोईन अब्दुल लतीफ | कनिष्ठ अभियंता, घोडे पाटबंधारे उपविभाग शिरूर, पुणे | सहा. अभियंता श्रेणी १, घोड पाटबंधारे उप विभाग शिरूर, पुणे |

( सुनावणी दिनांक - ३१ / १० /२०२५ )

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये दि.०८.०५.२०२३ रोजी दाखल केलेले सदर द्वितीय अपील राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांचेकडून दि.२७.०५.२०२४ रोजी पुणे खंडपीठास हस्तांतरणाने प्राप्त झाले. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत. तथापि अपिलार्थी यांचे लेखी निवेदन आयोगास प्राप्त आहे.

त्यामध्ये, दि. १०.०१.२०२३ रोजीच्या माहिती अर्जात मागणी केलेली माहिती घोडे पाटबंधारे उपविभाग शिरूर यांचेकडून समक्ष उपलब्ध करून दिली असल्याने माझे समाधान झाले आहे. त्यामुळे माझे सदर प्रकरण निकाली काढावे, असे अपिलार्थी यांनी नमूद केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थीच्या विनंतीवरुन प्रस्तुत द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३१७१ / २०२४ / पुणे 10182/2025 दिनांक - 20/11/25